# University of Mumbai

Phone - 022 – 2265 2816
E-mail - dy.registrar.tau@fort.mu.ac.in
ar.tau@fort.mu.ac.in

Academic Appointments &
Quality Assurance (AAQA)
Fort Campus, M.G. Road, Mumbai - 32

**NAAC Accredited with A++**


क्र.एएक्युए/आयसीडी/२०२२–२३/१६६२ दि. २४ मार्च, २०२३

**परिपत्रक :–**

विषय :– विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांच्या Academic Audit बाबत.

मुंबई विद्यापीठातंर्गत असलेल्या विना अनुदानित व कायम विनाअनुदानित बी.एड, एम.एड, बी.पी.एड, एम.पी.एड, विशेष बी.एड. व एकात्मिक बी.एड. अभ्यासक्रम चालविणा–या महाविद्यालयांचे संचालक / प्राचार्य यांना कळविण्यात येते की, श्री. गंगाधर दाते, प्र. सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, शासकिय अध्यापक महाविद्यालय, एलफिन्स्टन तांत्रिक विद्यालय आवार, १ ला मजला, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई–४०० ००१ यांचे क्र. शिशुस/शिक्षण शुल्क/ कार्यवाही / २०२२–२३/२०२२/०१, दिनांक ०२ जानेवारी, २०२३ रोजीच्या पत्रान्वये असे कळविण्यात आले आहे की, शिक्षण शुल्क समितीच्या दिनांक २५ नोव्हेंबर, २०२२ च्या बैठकीच्या इतिवृतातील विषय क्र.१०.६ अन्वये राज्यातील विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांचे Academic Audit कार्यवाही करणेबाबत राज्यातील सर्व विद्यापीठांना शिक्षण शुल्क समितीमार्फत कळविण्यात यावे असा निर्णय घेण्यात आला आहे.

तसेच उपरोक्त निर्णयाच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठांतर्गत असलेल्या विना अनुदानित व कायम विना अनुदानित बी.एड, एम.एड, बी.पी.एड, एम.पी.एड, विशेष बी.एड. व एकात्मिक बी.एड. अभ्यासक्रम चालविणा–या महाविद्यालयांचे Academic Audit करणेबाबतची कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मा.शिक्षण सचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे व सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई या कार्यालयास सादर करावा असे कळविले आहे.

..२..

# University of Mumbai

Phone - 022 – 2265 2816
E-mail - dy.registrar.tau@fort.mu.ac.in
ar.tau@fort.mu.ac.in

Academic Appointments & Quality Assurance (AAQA)
Fort Campus, M.G. Road, Mumbai - 32

*NAAC Accredited with A++*



तरी मुंबई विद्यापीठांतर्गत विना अनुदानित व कायम विना अनुदानित बी.एड, एम.एड, बी.पी.एड, एम.पी.एड, विशेष बी.एड. व एकात्मिक बी.एड. अभ्यासक्रम चालविणा—या महाविद्यालयांचे संचालक / प्राचार्य यांना विनंती करण्यात येते की त्यांनी याच्या संबंधीत महाविद्यालयांचे Academic Audit बाबत परिक्षण करून घ्यावे व त्याबाबतचे अहवाल विद्यापीठाकडे सादर करावा.

मुंबई : ४०० ०३२.
दिनांक : २४ मार्च, २०२३

(प्रा. सुनिल भिरूड )
प्रभारी कुलसचिव

**महाराष्ट्र शासन**
**उच्च शिक्षण संचालनालय**
**शिक्षण शुल्क समिती, मुंबई**
(राज्यातील विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांसाठी)
कार्यालयाचा पत्ता- शासकीय अध्यापक महाविद्यालय, एलफिन्स्टन तांत्रीक विद्यालय आवार,
१ ला मजला, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाब, मुंबई-४०० ००१
Web:www.mahasss.in Tel-022 20824478 E-mail : sssbedmed@gmail.com

शिशुस/शिक्षण शुल्क/कार्यवाही/२०२२-२३/२०२२/०७ दि. -१२-२०२२ ०२.०१.२०२३

प्रति,

१. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई
२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
३. कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
४. कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
५. कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर
६. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
७. कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
८. कुलसचिव, एस.एन.डी.टी. विद्यापीठ, मुंबई
९. कुलसचिव, कवयत्री बहीणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव
१०. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
११. कुलसचिव, कवीकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक, नागपूर

PA to R
UNIVERSITY OF MUMBAI
IS/ICD/EOD/20
0 6 JAN 2023
21032

**विषय:- विनाअनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांच्या Academic Audit बाबत.**
**संदर्भ:- शिक्षण शुल्क समितीच्या दि.२५.११.२०२२ च्या बैठकीचे इतिवृत्त.**

महोदय,

उपरोक्त विषयांकीत प्रकरणी, शिक्षण शुल्क समितीच्या दि.२५.११.२०२२ च्या बैठकीच्या इतिवृत्तातील विषय क्र.१०.६ अन्वये राज्यातील विनाअनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांचे Academic Audit करणेबाबतची कार्यवाही करणेबाबत राज्यातील सर्व विद्यापीठांना शिक्षण शुल्क समितीमार्फत कळविण्यात यावे, असा निर्णय झाला आहे.

या निर्णयाच्या अनुषंगाने आपल्या विद्यापीठांतर्गत असलेल्या विनाअनुदानित व कायम विना अनुदानित बी.एड, एम.एड, बी.पी.एड, एम.पी.एड, विशेष बी.एड व एकात्मिक बी.एड अभ्यासक्रम चालविणाऱ्या महाविद्यालयांचे Academic Audit करणेबाबतची कार्यवाही करण्यात यावी. केलेल्या

कार्यवाहीचा अहवाल मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे व सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई या कार्यालयास सादर करावा, ही विनंती.

(गंगाधर दाते)
**प्र.सहसंचालक,**
**शिक्षण शुल्क समिती, मुंबई**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर-**

**१.मा. अध्यक्ष, शिक्षण शुल्क समिती तथा मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२**

**२.मा. सदस्य सचिव, शिक्षण शुल्क समिती तथा मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-०१**

प्रधान सचिव
उच्च व तंत्र शिक्षण
यांचे कार्यालय
क्र. ३८७७
दि. ०७/१२/२२

महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय
शिक्षण शुल्क समिती, मुंबई
(राज्यातील विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांसाठी)
कार्यालयाचा पत्ता- शासकीय अध्यापक महाविद्यालय, एलफिन्स्टन तांत्रीक विद्यालय आवार,
१ ला मजला, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१
Web:www.mahasss.in Tel-022 20824478 E-mail : sssbedmed@gmail.com

## शिक्षण शुल्क समितीच्या दि.२५-११-२०२२ च्या बैठकीचे इतिवृत्त

राज्यातील विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाचे शै.वर्ष २०२१-२२ साठीचे शिक्षण शुल्क निश्चित करण्यासाठी शिक्षण शुल्क समितीची बैठक दि.२५-११-२०२२ रोजी स.१०:३० वाजता मा. अध्यक्ष, शिक्षण शुल्क समिती, मुंबई तथा मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय यांचे अध्यक्षतेखाली मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या दालनात पार पडलेल्या शिक्षण शुल्क समितीच्या बैठकीस खालील सदस्य/अधिकारी उपस्थित होते:-

| अ.क्र. | उपस्थित अधिकारी/ पदाधिकारी | पदनाम |
|---|---|---|
| १ | मा.श्री. विकास चंद्र रस्तोगी, मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग | अध्यक्ष |
| २ | मा.श्री. बबन माळी, उपसचिव, वित्त विभाग (मा. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय यांचे प्रतिनिधी) | सदस्य |
| ३ | मा. डॉ. शैलेन्द्र देवळाणकर, प्र. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य सचिव |
| ४ | डॉ. माधुरी कागलकर, प्राचार्य, सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, मुंबई | सदस्य |
| ५ | श्री.व्ही.बी. शर्मा, सनदी लेखापाल | सदस्य |
| ६ | डॉ. महेश देशपांडे - खाजगी शिक्षक प्रशिक्षक संघटनेचे प्रतिनिधी (शारीरिक शिक्षणशास्त्र) तथा सहयोगी प्राध्यापक, चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालय, पुणे | सदस्य |
| ७ | श्री. हरिविजय शिंदे, सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई | सदस्य |

विशेष निमंत्रित म्हणून श्री. प्रताप लुबाळ, उपसचिव (मशि), उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई, श्री. सुनिल सोनवणे, प्र.प्राचार्य, शासकीय अध्यापक महाविद्यालय, मुंबई तथा शिक्षणशास्त्र विषयाचे तज्ज्ञ, श्री. राजेंद्र ढाकणे, सहा. प्राध्यापक, शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, मुंबई तथा शारिरीक शिक्षणशास्त्र विषयाचे तज्ज्ञ व श्री. धनाजी बासके, खर्च लेखापाल हे उपस्थित होते. तसेच डॉ. नलिनी पाटील - खाजगी शिक्षक प्रशिक्षक संघटनेचे प्रतिनिधी (शिक्षणशास्त्र) तथा प्राचार्य, एस.एन.डी.टी. कॉलेज ऑफ एज्यूकेशन, पुणे यांनी बैठकीस उपस्थित राहू न शकत असल्याबाबत लेखी कळविले आहे.

Scanned with CamScanner

१०.४ ज्या महाविद्यालयांनी सन २०२१-२२ ला शुल्क निश्चितीकरिता प्रस्ताव सादर केले नव्हते अशा महाविद्यालयांकडून सन २०२२-२३ करिता प्रस्ताव मागविणेबाबत समितीने मान्यता दिली.

१०.५शिक्षण शुल्क समितीच्या नामनिर्देशित सदस्यांचा बैठक भत्ता व प्रवास भत्त्याबाबत समितीच्या पुढील बैठकीपूर्वी निर्णय होणेबाबत निर्देश देण्यात आले.

१०.६ राज्यातील विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांचे Academic Audit करणेबाबतची कार्यवाही करणेबाबत राज्यातील सर्व विद्यापीठांना शिक्षण शुल्क समितीमार्फत कळविण्यात यावे, असा निर्णय झाला.

उपरोक्त परिशिष्टात नमूद शिक्षण शुल्काबाबत आक्षेप असल्यास सबळ अभिलेख/कागदपत्रासह ८ दिवसात समितीकडे सादर करावेत. समितीच्या पुढील बैठकीत सदर आक्षेप सादर करण्यात येतील.

सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती यांनी उपस्थितांचे आभार मानले व सदर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव,
शिक्षण शुल्क समिती
तथा
प्र.संचालक, उच्च शिक्षण, पुणे

अध्यक्ष,
शिक्षण शुल्क समिती
तथा
प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई

Scanned with CamScanner